International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# १८७१ चा ''गुन्हेगार जमात कायदा''आणि पारधी समाज जीवन

**राजश्री मधुकर लांडगे**
*संशोधक. ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र,*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , छ. सांभाजीनगर*
*Corresponding Author – राजश्री मधुकर लांडगे*
DOI - 10.5281/zenodo.17662217

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाहून अधिक वर्ष लोटली आहे, संविधानातील मानवी अधिकारानुसार आपण बघतो की भारत देशामध्ये सामाजिक लोकशाही, समता, स्वातंत्त्य, बंधुता, न्यायिक अधिकार हे भारतातील सर्व नागरिकांना मिळाले आहेत. आज प्रत्तेक भारतातील नागरिकांना आपापले हक्क आणि अधिकार माहिती आहे. आणि ते अधिकार प्रत्तेक मनुष्य आपल्या दैनंदिन जीवनामध्ये पाळताना दिसतो. प्रात्तेक व्यक्तीचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य उपभोगताना दिसतो. आज स्वतंत्र भारतातील मानवी हक्क आणि अधिकार जे मुख्य प्रवाही शिक्षित समुदाय उपभोगत आहेत ते अधिकार आजही काही जाती-जमातींना मिळालेले दिसून येत नाही. किंवा आज देखील या भटक्या विमुक्त जमाती मधील व्यक्ती किंवा समूह हा मुक्तपणे संचार करताना दिसून येत नाही. कधी देवाच्या नावाने, कधी धर्माच्या नावाने, तर कधी गुन्हेगार समजल्या जाणाऱ्या जातीच्या नावाने समाजामध्ये भेदभावाचे वातावरण आज देखील आपणास दिसून येते, त्याचबरोबर उच्च आणि प्रतिष्ठित समजला जाणारा समाज आजही या समाजाबरोबर एकत्रित राहणे पसंत करत नाही. आज एकविसाव्या शतकामध्ये मनुष्य चंद्रावर जाऊन प्रगती करत आहे, तर एकीकडे अशा जमाती आहेत, त्या आज देखील समाजातील मुख्य प्रवाह पासून, भौतिक सुख सुविधांपासून, शिक्षणापासून, आर्थिक व्यवहारा पासून, एकंदरीत सर्वच गोष्टींमध्ये या जमाती कोसो दूर असल्याचे दिसून येते. या जमाती आज सुध्दा लोकांना लाकडे देतत व त्या बदल्यात गहू घेतात, डिंक देतो आणि शेण घेतो, गोड तेल वापरायचे असते हे माहीत नसलेल्या जमाती या भटक्यांच्या आहेत. चहामध्ये दूध वापरले की पाप होते अशी समज असणाऱ्या जमाती भटक्यांच्या आहेत. हा जो सर्वात दुर्लक्षित समजला जाणारा समाज ज्याला गावच काय त्यांची गावात साधी ओळखही निर्माण झालेली दिसून येत नाही. याच कारण म्हणजे या जमाती फार पूर्वीपासून गावकुसाबाहेर आपले जीवन जगत आहेत, आणि गुन्हेगारी जमात म्हणून देखील समाजाचा दृष्टिकोन तसा बनत गेला.सतत मनामधे भीती बाळगणाऱ्या या जमाती मुख्य प्रवाहाच्या लोकांपासून दूर राहणे पसंत करतो कारण शिक्षित समजला जाणारा हा समाज आजही जातिव्यवस्थेच्या, वर्णव्यवस्थेच्या आहारी गेलेला समाज आहे,त्यामुळे आजदेखि मुख्य प्रवाहातील लोक

आपली वस्ती ( सोसायटी) या लोकांपासून दूर असली पाहिजे असा समज आजही लोक पाळतात. याचे कारण म्हणजे गावात कुठेही चोरी झाली की याच जातीच्या लोकांना दोषी ठरून मोकळे होतात. त्यामुळे गावात कुठेही चोरी झाली की पोलीस पारध्यांच्या वस्तीत येऊन उचलून नेतात.आणि जीव जाई पर्यंत मारहाण करतात. पारध्यांमध्ये पुरुषापेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे याच कारण म्हणजे पारधी पुरुष हे जेल मध्ये मार खाऊन मरतात,किंवा चोऱ्या ,लुटमार करताना खून खराब्यांमधे त्यांचा मृत्यू होतो. तर काही पुरुष जेल मध्ये जाण्याच्या भीतीने विष पिऊन मरणे पसंत करतात. त्यामुळे या जाचाला कंटाळून या जमाती दूर राहणे पसंत करतात.

**विषयाचे महत्त्व :**

ई. स.१८७१ मध्ये ब्रिटिशांनी भटक्या जमातींवर गुन्हेगारी जमात असा शिक्का त्यांच्या माथी मारला गेला तेव्हापासून ते आज पर्यंत या समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा या जमाती गुन्हेगारी करणाऱ्या जमाती आहेत म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. भटक्या समजल्या जाणाऱ्या जमाती पैकी पारधी समाज हा एक भटका समाज आहे., जो सतत आपल्या पोटाची भूक भागविण्यासाठी वन वन भटकत राहतो.त्यामधे स्त्रियांचे जीवन हे पुरुषांपेक्षा ही खूप हाल अपेष्टासह मरणयातना देणारे आहे, पैशासाठी स्वतःच्याच नातेवाईकांमधे विकली जाणारी ही स्त्री आहे, तिला तिचे शरीर अबाधित ठेवण्याचा सुद्धा अधिकार नाही किंवा ती त्या पुरुषाला विरोध करेल एवढा देखील अधिकार तीला नसतो, कारण पैशासाठी गहाण ठेवण्याची पद्धत आजही पारधी जमातीत आहे. मुलीच्या लग्नानंतर ही पारधी समाजात मुलीच्या बापाचा हक्क कायम असतो, जर मुलीचे लग्न झाले असेल व मुलीच्या वडिलांना ठरलेले व्याज मिळाले नसेल तर मुलीचे वडील मुलीच्या पहिल्या नवऱ्याला सोडून जादा व्याज देणाऱ्या व्यक्तीशी मुलीचे दुसरे लग्न लावून देतो,कारण पारधी समाजात मुलीला हुंडा मिळतो आणि त्या हुंड्याची रक्कम जर वेळेवर मिळत नसेल तर मुलीचे वडील तिला पहिल्या नवऱ्यापासून वेगळ पण करू शकतो, त्याचप्रमाणे भटक्या समाजातील एकंदरित सर्वच स्त्रियांची स्थिती जर पहिली तर त्यांना त्यांच्या रोजच्या जगण्याशी संघर्ष त्यांना करावा लागतो त्यामुळे या समाजातील स्त्रियांचं जीवन हे ईतर स्त्रियांच्या तुलनेत फार वेगळे दिसून येते.

या आगोदर या विषयावर अनेक अभ्यासकांचे काम झालेले आहेत, त्यामधे नारायण भोसले, रामनाथ चव्हाण, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, प्रदीप आगलावे, सुनीता भोसले, मनीषा तोकले यांचं या कष्टकरी भटक्या जमाती वर त्यांचं मोलाचं काम आहे.

परंतु तरीदेखील या समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा इतर समाजाचा तोच आहे जो पूर्वीपासून त्यांच्याकडे “गुन्हेगार जमात” म्हणून पाहत आलेला आहे. कारण अनेक वर्षांपासून ते आजपर्यंत हा समाज दुर्लक्षित आहे.त्यामुळे यावर आणखी मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे असे मला वाटते

**भटका म्हणजे काय?**

मोतीराज राठोड यांनी भटके या शब्दाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की,

“ ज्यांना एका ठिकाणी उदरनिर्वाहाचे साधन नाही गाव नाही शिवार नाही पोटाचे ओझे डोक्यावर घेऊन आज येथे उद्या तेथे उदरनिर्वाहाच्या शोधात भटकणाऱ्या जमातींना आपण भटक्या जमाती म्हणतो.”

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जातींची एकूण संख्या १४ एव्हढी आहे. या जमातीच्या उपजतीची

संख्या १४०आहे. व सर्व मिळून१८३ जाती उपजतीना महाराष्ट्र सरकारची मान्यता आहे की या जाती जमाती भटक्या आहेत.

**भटक्या विमुक्तांची प्राचीन काळातील स्थिती:**

आर्यांच्या आगमनापूर्वी या देशात द्रविड व नागवंशीय लोक राहत होते. एस. जी. सरदेसाई यांच्या मते ज्यांची मातृभाषा वैदिक संस्कृती होती आणि ज्यांनी वेद ग्रहण केले ते आर्य. आर्यांच्या टोळया जेव्हा भारतात आल्या तेव्हा अनेक स्थानिक टोळयांचा तिच्यात समावेश झाला. या समावेशांमध्ये दोघांमध्ये संघर्ष झाला. त्याच बरोबर अनेक वैचारिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आर्यांनी स्थानिक लोकांकडून ते ज्ञान आत्मसात केले. नाग हे आर्य नव्हते, समाजामध्ये आर्यांचे स्थान प्रस्थापित करण्यासाठी आर्यांची संस्कृती समाजावर थोपविण्याचा प्रयत्न सुरू झाला. कुटीलतेने आक्रमण करून ज्यांचे हत्यारे श्रेष्ठ त्यांची संस्कृती श्रेष्ठ या युक्तीप्रमाणे आर्यांनी देशात आक्रमण करून स्थानिकांना म्हणजेच मूळ निवासी यांना गुलाम केले व आपली संस्कृती स्थानिकांवर लादण्याचा प्रयत्न केला दलित आदिवासी हे लोक त्याकाळी देशाचे मालक होते परंतु त्यांच्याजवळ मनुष्यबळ नसल्याकारणाने ते आर्या समोर टिकू शकले नाही, त्यातील काही जमाती या जीवन जगण्यासाठी लाचार आणि  पशुतुल्य जीवन पत्करावे लागले. त्यामुळे या जाचाला कंटाळून ते जंगले, दऱ्याखोऱ्यात, रानावनात पळून जाऊन आपले रानटी जीवन जगू लागले पोटापाण्याच्या उदरनिर्वाहासाठी कालांतराने याच समूहातील लोक गुन्हेगारी प्रवृत्तीला बळी पडत गेले. त्यानंतर वेदाप्रमाणे मनुस्मृति हा ग्रंथरचला गेला. मनुस्मृतीने वैदिक धर्म वाढवला आणि जातिव्यवस्थेला खतपाणी मिळाले, व ब्राह्मणांना प्रतिष्ठा मिळवून दिले आणि शूद्र अतिशूद्र या जमाती या गुन्हेगार जमातींना अत्यंत तुच्छ वागणूक दिली जावी यासाठी तशी व्यवस्था निर्माण केली.त्यातून पितृसत्ताक व्यवस्थेचा उगम झाला,त्यामुळे अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या स्त्रियांना परंपरेच्या नावाखाली गुलाम बनविले गेले .

**भटक्या जमातींचे काही वैशिष्ट्य आहे:**

१) निसर्गाला देव (सर्वस्व) मांनने.

२) मुख्य प्रवाहापासून दूर राहणे पसंत करतात.

३) परंपरेने चालत आलेली बंधने स्त्रियांना बंधनकारक.

**भटक्या विमुक्तांच्या माथी लागलेला "गुन्हेगार जमात कायदा" :**

टी. व्ही. स्टीफन्स हा ब्रिटिश अधिकारी होता. तो मध्यवर्ती कायदा व कौसिल चा सदस्य होता, सन १८७१ मध्ये या ब्रिटिश अधिकाऱ्याने गुन्हेगार जमात कायदा (क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट ) हा कायदा पारित केला. त्यामुळे भारतातील १५० जमाती या गुन्हेगार म्हणून घोषित केले गेल्या व तेव्हापासून त्यांना एका तारेच्या कुंपनामधे डांबून ठेवण्यात आले त्यांच्या प्रत्येक हालचालींवर देखरेख ठेवून वेळीच प्रसंगी त्यांना अटक करण्याचे विस्तृत अधिकार त्यांना देण्यात आले होते. या कायद्यानुसार गुन्हेगार जमातीत जन्म घेतला तर जन्माला येणारे आपत्येही गुन्हेगार ठरतो, म्हणजेच हा कायदा असे म्हणतो की तुम्ही जिवंत आहात म्हणजेच तुम्ही गुन्हेगार आहात. हा ठराव मंजूर करतेवेळी टीव्ही स्टीफन्स हा ब्रिटिश अधिकारी म्हणाला होता की पुरातन काळापासून या जमाती गुन्हेगार करणाऱ्या जमाती आहेत, त्यांच्या जातीच्या वहीवटी प्रमाणे गुन्हा करणे हे त्यांच्या नशिबातच आहे आणि आजपर्यंत संपूर्ण जमातीचा नाश होत नाही तोपर्यंत त्यांचे वंशज

कायदा धाब्यावर बसून आहेत त्यांच्या मते गुन्हेगार हा त्यांचाधर्म आहे. या सर्व गोष्टींचा संदर्भ जर आपण घेतला तर प्राचीन संस्कृतीचा संदर्भ देऊ शकतो,आर्यांच्या कुटील प्रवृत्तीच्याआगमनामुळे भारतातील मूळ निवासियाना गुलाम बनविले आणि त्यांना जातीच्या बेड्यामधे बंदिस्त केले.तेव्हापासून ते आजपर्यंत या जमाती गुलामीचेच जीवन जगताना दिसून येतात.

**भटक्या विमुक्तांच्या चळवळी :**

भारताला स्वातंत्र्य मिळाले डॉ बाबासाहेब यांनी लिहिलेल्या भारतीय राज्य घटनेतून दिलेले समान अधिकारामुळे १९५१ मध्ये भारतीय राज्य घटनेच्या तरतुदीनुसार या भटक्या जमाती विमुक्त झाल्या.१९६९ ते ७० या दशका पासून अनेक चळवळी, आंदोलने, मोर्चे प्रबोधने झाली .परंतु पाहिजे तेव्हढ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसून येत नाही. शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाही.शिक्षणाचे महत्व त्यांच्यापर्यंत पोहचले नाही. थोड्याफार प्रमाणात हा समाज शिक्षणाकडे वळताना दिसत आहे, पण अजून मोठ्या प्रमाणात बदल होणे गरजेचे आहे.

**समारोप :**

भारतीय समाज व्यवस्था आणि भटका समजला जाणारा पारधी समाज या दोघातील अंतर जर बघीतले तर खूप मोठा दुरावा हा शिक्षित समाज (मुख्य प्रवाही समाज ) आणि भटका पारधी समाज यामधे दिसून येतो. मुळातच भारतीय समाज व्यवस्था ही जातिव्यवस्थे वर अवलंबून आहे. त्यामुळे जातीचे वर्चस्व टिकउन ठेवण्याचे षडयंत्र हे पूर्वीपासूनच झालेले दिसून येते, त्या माध्यमातुन स्त्रियांना संस्कृतीचे गुलाम बनविले आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे जातीव्यवस्था ही नष्ट झाली पाहिजे त्यामुळे समाजात समानतेची भावना आपआपसात निर्माण होऊ शकते.

शासनाची नवनवीन धोरणे या जमातीपर्यंत कशा पोहचतील याची दखल घेणे गरजेचे आहे . आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण सर्वानाच सक्तीचे आणि मोफत दिले पाहिजे. शासनाच्या नवनवीन उपाययोजना या जमातीपर्यंत पोचतात कि नाही याचा देखील पाठपुरावा शासनाने घेतला पाहिजे.हळू हळू शिक्षणाकडे हा समाज वळताना दिसून येत आहे परंतु पाहिजे त्या प्रमाणात नाही, शिक्षण घेऊनही त्यांच्यामधील असणाऱ्या पारंपारिक परंपरा त्यांच्या सोडलेल्या दिसून येत नाही. त्यामुळे या समाजावर

जाती जमातीवर जास्तीत जास्त संशोधने होणे गरजेचे आहे, त्यामुळे त्यांचे प्रश्न सोडविण्यास मदत होऊ शकेल.

**संदर्भ:**

१) कांबळे उत्तम, जात पंचायत नावाचा स्पीड ब्रेकर, संचालक, संपादक सकाळ मध्यम समूह Email- uttam.kamble@esakal.com

२) चव्हाण रामनाथ, भटक्यांची जात पंचायत, खंड 1, देशमुख आणि कंपनी, प्रा. ली.पहिली आवृत्ती 2002

३) भोसले सुनीता, सहलेखन रूपवते प्रशांत, रोहन प्रकाशन, दुसरी आवृत्ती 2021

४) गायकवाड दीपक, आदिवासी चळवळ स्वरूप व दिशा, सुगावा प्रकाशन पुणे 30, प्रथम आवृत्ती 15 ऑगस्ट 2005

५) सरदेसाई एस. जी. भारतीय तत्त्वज्ञान वैचारिक आणि सामाजिक संघर्ष लोकवाड:मय गृह, तिसरी आवृत्ती 1989

६) माने लक्ष्मण, उपरा, ग्रंथाली प्रकाशन, पाचवी आवृत्ती, 25 नोव्हेंबर 2000
७) डिसुझा दिलीप, जन्माने गुन्हेगार, पद्मगंधा प्रकाशन पुणे , प्रथम आवृत्ती 2008
८) डॉ.पवार दीपक, पारधी समाजाचे अंतरंग, श्री साईनाथ प्रकाशन, प्रथम आवृत्ती 25 सप्टेंबर 2014
९) डॉ.भोसले नारायण, विमुक्त प्रबोधन, अथर्व पब्लिकेशन्स धुळे.